

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर

।। विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।





शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर

पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

समाचार

Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine December 2019 - Pages - 44

संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे कार्यकारी संपादक : प्राचार्य हणमंत भोसले

❊ पुणे ❊ वर्ष ७१ वे ❊ अंक २ ❊ किंमत रु. १०/- ❊ वार्षिक वर्गणी रु. १००/-



अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पुणे येथे
कै. सौ. निर्मला राजीव केतकर शिष्यवृत्ती (शैक्षणिक वर्ष २०१९ - २०) प्रदान समारंभ प्रसंगी
डावीकडून प्रा. प्रिती खत्री, श्री. राजीव केतकर यांचे साडू श्री. वेलणकर, सौ. हिमानी केतकर,
सौ. दिप्ती राजोपाध्ये, सौ. नंदिनी केतकर,
शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थिनी कु. वैष्णवी सूर्यवंशी, कु. शांभवी कुलकर्णी,
ग्रुप कॅप्टन श्री. राजीव केतकर, जावई श्री. मेहूल राजोपाध्ये, कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर,
संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, प्राचार्य डॉ. योगेश नेरकर

❊ संस्था मुख्यालय, पुणे ❊



संस्थेच्या देणगीदार
श्रीमती गीता हिरण्मय साने यांनी
दि. ६.११.२०१९ रोजी
रु. २ लाखांची भरीव देणगी
मा. वि. कै. रघुनाथ पांडुरंग साने
यांचे पुण्यस्मरणार्थ दिलेली आहे.
त्याप्रसंगी पुष्पगुच्छ देऊन
त्यांचे आभार मानताना
कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे,
श्रीमती साने यांच्या स्नुषा
सौ. गायत्री सर्वेश साने
यांचा सत्कार करताना
कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे.
समवेत संचालक श्री. रमेश कुलकर्णी,
श्री. आनंद कुलकर्णी आणि
श्री. कृष्णाजी कुलकर्णी

❊ अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पुणे ९ ❊



दि. ८ नोव्हेंबर रोजी प्राध्यापकांसाठी आय. ओ. टी. या विषयावर एमकेसीएलने एकदविसीय कार्यशाळा आयोजित केली होती.
या कार्यशाळेत 'स्मार्ट क्लासरुम' च्या माध्यमातून सहभागी झालेले नाशिक येथील महाविद्यालयातील प्राध्यापक
समवेत संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर





सौ. माधवी हेमंत बेलसरे



सौ. मिनाक्षी प्रदीप अत्रे



महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन विभागातील प्राध्यापिका सौ. माधवी हेमंत बेलसरे आणि
प्राध्यापिका सौ. मिनाक्षी प्रदीप अत्रे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पीएच. डी. प्राप्त केली.
त्यांचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन !

संपादकीय

संक्रमण एक प्रक्रिया

सृष्टीमध्ये संक्रमण होत असते व संक्रमणाच्या या प्रक्रियेचा उत्सव आपण दरवर्षी साजरा करीत असतो. निसर्गात येणारा संक्रमणाचा काळ मनुष्य जीवनातही येत असतो. मनुष्य जीवनात आगामी काळात होणारे संक्रमण यावर नीट लक्ष ठेवून विचार केला आणि त्यानुसार आचरण केले तर कोणताही संक्रमण काळ हा सुकर होऊ शकतो. समाज समृद्धीच्या पायरीवर जीवनाकडे आशेने पहात आहे व ही समृद्धी संक्रमणाचाच एक भाग आहे व त्याचे आपण सर्वजण साक्षीदार आहोत.

कोणत्याही काळात संक्रमण ज्यावेळेस होते ते अनेक प्रकारच्या अनुभवाने भरलेले असते. संक्रमणामुळे सुखच मिळाते ही अपेक्षा चुकीची आहे. बऱ्याच वेळा संक्रमण काळात काही संकटे उभी राहतात. सगळीकडे वाईट गोष्टी घडत आहेत याची भावना मनात येते. दूरदृष्टीचा विचार करणे शक्य होत नाही. दूरदृष्टीने पाहण्याचा विचारही बऱ्याच वेळा खुंटतो. जे व्हावयाचे आहे ते सगळे झाले आहे, करण्यासारखे काही नाही, असा नैराश्याचा काळही समोर येऊन उभा राहतो. अर्थात संक्रमणाच्या या परिस्थितीला कौशल्याने, विचाराने, बुद्धीने, धीराने, धैर्याने सामोरे गेल्यास संक्रमण काळ सुध्दा प्रगतीचा आणि नवीन दिशा देणारा होऊ शकतो.

मनुष्याच्या जीवनामध्ये यश - अपयश, सुख - दुःख, हार - जीत या गोष्टी त्या त्या वेळेच्या परिस्थितीवर अवलंबून असतात. रागावून, शक्तीचा वापर करुन, लोकांची दिशाभुल करुन, काही वेळेला तात्पुरते समाधान लाभू शकते. परंतु समस्यांच्या मुळाशी जाऊन कोणत्या प्रकारची विचार सरणी आत्मसात करावी; मनातील चुकीची भावना, द्वेष, आकस, अहंपणा या गोष्टी कशा प्रकारे बाजूला ठेवता येतील याचा सर्वसमावेशक विचार करता यावयास हवा. यदाकदाचित असा विचार बाहेरील, जवळचे व्यक्तीमुळे करणे शक्य होत नसेल तर चांगल्या लोकांच्या सहवासात जाऊन आपल्या विचारांची दालने खुली करुन मार्गदर्शन घेणे योग्य ठरते. मिळालेल्या मार्गदर्शनानुसार अहंभाव न बाळगता कार्यान्वित होणे, विचार करणे यामुळे कोणतीही समस्या सोडविण्यास अडचण येत नाही. कोणत्याही प्रकारची अयोग्य विचारधारा ही केव्हाही यश देऊ शकत नाही. गैर भावनेमुळेच वैमनस्य वाढीस लागते. शांत चित्ताने विचार करणे, चांगल्या लोकांच्या संगतीत राहणे, चांगले सांगितल्यावर त्यावर मनन करणे व त्यादृष्टीने वाटचाल केल्यास परस्परात वैमनस्य न राहता विचारात संक्रमण होऊन सगळ्याचे जीवन सुकर होऊ शकते. मात्र त्यासाठी आपला विचार हा सात्विक व शुध्द असावयास हवा.

श्री दत्त जयंती
११ डिसेंबर २०१९

डॉ. आर. पी. जोशी यांना भावपूर्ण श्रद्धांजली



संस्थेचे देणगीदार, माजी कार्याध्यक्ष, कार्यवाह आणि संस्थेच्या मुक्तांगण इंग्लिश स्कूल, सहकारनगर, पुणे या नामवंत शाळेचे माजी प्राचार्य डॉ. आर. पी. जोशी यांचे शुक्रवार दि. १५.११.२०१९ रोजी वयाच्या ६६व्या वर्षी आजारपणामुळे दुःखद निधन झाले.

डॉ. आर. पी. जोशी यांनी संस्थेच्या कॉलेज वसतिगृहामध्ये राहून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. सन १९७८ पासून मुक्तांगण इंग्लिश स्कूल या शाळेचे संचालक म्हणून कामास सुरुवात केली आणि प्राचार्य कै. म. द. कश्यप यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांनी शाळेचे प्राचार्य म्हणून उत्तम कार्यभार सांभाळला. शाळेस पुण्यामध्ये व महाराष्ट्रातही नावलौकिक प्राप्त करुन दिला. डॉ. आर. पी. जोशी यांनी संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक पद सांभाळून संस्थेच्या वाढ व विकासामध्ये इतर संचालकांच्या मदतीने आपल्या कामाचा ठसा उमटविला.

डॉ. आर. पी. जोशी यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विधिमंडळावर सभासद म्हणून काम केलेले आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ या संघटनेचे डॉ. आर. पी. जोशी सरकार्यवाह म्हणून गेली अनेक वर्षे काम करीत होते.

डॉ. आर. पी. जोशी यांनी पुण्यामध्ये शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातही काम केलेले आहे. त्यांच्या निधनाने शिक्षण क्षेत्राची व विविध सामाजिक आणि शैक्षणिक संघटनांची व कौटुंबिक हानी झाली आहे.

त्यांच्या निधनामुळे शनिवार दि. १५.११.२०१९ रोजी संस्थेच्या सर्व विभागामध्ये स्तब्धता पाळून श्रद्धांजली अर्पण केली. तसेच शनिवार दि. १६.११.२०१९ रोजी सर्व कार्यालये बंद ठेवून दुखवटा पाळण्यात आला.

डॉ. आर. पी. जोशी यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर जो आघात झाला आहे त्या दुःखामध्ये संस्थेचे पदाधिकारी, संचालक व सर्व सेवक वर्ग सहभागी असून त्यांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना. ***

डॉ. ना. वा. देशपांडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली



संस्थेचे हितचिंतक, देणगीदार व १९५६ च्या मॅट्रीक बॅचचे आश्रमस्थ माजी विद्यार्थी डॉ. नारायण वामन देशपांडे यांचे सप्टेंबर २०१९ मध्ये वयाच्या सुमारे ८०व्या वर्षी अमेरिकेमध्ये दुःखद निधन झाले आहे.

श्री. शरद आंबेकर, श्री. मुकुंद गांगल, श्री. इनामदार, श्री. एम. अे. जोशी, श्री. आर. एम. दांडेकर, इ. डॉ. ना. वा. देशपांडे यांचे समकालीन संस्थेतील विद्यार्थी होते.

डॉ. ना. वा. देशपांडे यांनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे येथून बी.ई. मेकॅनिकल ही पदवी प्राप्त करुन सन १९६१ च्या सुमारास पुणे विद्यापीठामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. इंडिया फाऊंडेशन व इतर स्कॉलरशीप मिळवून त्यांनी परदेशात एम.एस. व पीएच.डी. चे शिक्षण पूर्ण केले.

डॉ. ना. वा. देशपांडे यांनी अमेरिकेमधील स्थाईक असलेल्या अनेक भारतीय बंधू भगिनींना पुणे विद्यार्थी गृह या संस्थेचे कार्य सांगून देणगीसाठी आवाहन करुन प्रवृत्त केले. त्याला सर्वांनी उत्तम प्रतिसाद देऊन संस्थेस सन १९८८ पासून आजअखेरपर्यंत भरीव मदत केली. त्यामध्ये दरवर्षी

डॉ. ना. वा. देशपांडे पतीपत्नी यांच्या देणगीचा वाटा मोठा होता. डॉ. ना. वा. देशपांडे यांच्या मनामध्ये आपल्या मातृसंस्थेविषयी असलेली प्रेमाची, आदराची भावना, निष्ठा व संस्थेस सर्व प्रकारची मदत करावी ही तळमळ इ. गोष्टींचे दर्शन घडून येते.

डॉ. ना. वा. देशपांडे यांनी गुडविल असोसिएशन ऑफ अमेरिका रोचेस्टर फंड या नावाने पुणे विद्यार्थी गृहामध्ये स्थापन केलेल्या निधीच्या व्याजातून दरवर्षी संस्थेच्या शाळा व महाविद्यालयातील गरीब, गरजू व हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत दिली जाते. या फंडामध्ये दि. ३१.३.२०१९ अखेर सुमारे रु. ९,५७,२५०/- इतकी देणगी जमा आहे. ही देणगी संस्थेला मिळवून देण्यामध्ये डॉ. ना. वा. देशपांडे यांचा सिंहाचा वाटा आहे त्याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

डॉ. ना. वा. देशपांडे यांच्या कुटुंबियांवर त्यांच्या निधनाने जो आघात झाला आहे त्या दुःखामध्ये संस्थेचे पदाधिकारी आणि सेवकवर्ग सहभागी आहेत. त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना.

***

विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर, मुंबई शाखा

कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे

संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ

विद्याभवन नं २
मुख्याध्यापक श्री. पांडुरंग बाबुराव मुळीक

निसर्ग मंडळ

दि. २७ ऑगस्ट २०१९ रोजी निसर्गमंडळाने श्रावण महोत्सव उत्साहात साजरा केला. कार्यक्रमात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांनी सुंदर वेशभूषा केली होती. मुलींनी महाराष्ट्रीयन वेशभूषा करुन मंगळागौरीची गाणी गायली तसेच झिम्मा, फुगडी अशी पारंपारिक नृत्ये सादर केली. श्रावणमासाची महती व माहिती या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना सांगण्यात आली.

औषधी वनस्पती प्रदर्शन

दि. ३० ऑगस्ट २०१९ रोजी निसर्गमंडळातर्फे औषधी वनस्पतीचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. इयत्ता ६वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या औषधी वनस्पती प्रदर्शनासाठी मांडल्या तसेच त्यांची औषधी उपयुक्तता सांगितली. या प्रदर्शनास परिक्षक म्हणून सौ. सरला नरेंद्रन् सौ. योगिनी पोतदार यांनी उपस्थिती दर्शविली होती.

गौरव समारंभ लायन्स क्लब ऑफ घाटकोपर

दि. १५ ऑक्टोबर २०१९ रोजी लायन्स क्लब ऑफ घाटकोपर यांच्या तर्फे इ. १० वीत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या शिक्षकांचा गौरव करण्यात येतो. या वर्षी देखील आपल्या प्रशालेस १००% निकालाची परंपरा कायम राखल्याबद्दल सन्मानचिन्ह देण्यात आले. तसेच प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक श्री. प्रकाश जगन्नाथ पवार, श्रीमती लिना शिंदे, श्रीमती राजश्री वळसे यांना गौरविण्यात आले. विद्याभवन इंग्रजी माध्यमातील तसेच मराठी माध्यमातील माध्यमिक परीक्षेत प्रशालेत प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचांही सत्कार या प्रसंगी करण्यात आला.

विद्यार्थ्याचे नाव	माध्यम
कु. निरंजन दीपक कुऱ्हाडे	इंग्रजी
कु. स्नेहा बाबु गोसुला	इंग्रजी
कु. नितीन नारायण झोरे	मराठी
कु. सानिका नारायण चोगले	मराठी

गीता वक्तृत्व स्पर्धा संस्कृत

दि. ३.८.२०१९ रोजी माजी विद्यार्थी मंडळातर्फे गीता वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रशालेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे भाग घेतला. शाळेतील खालील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

गट क्र १ (इंग्रजी माध्यम)

विद्यार्थ्याचे नाव	इयत्ता/तुकडी
कु. शुभ्रा संजय सावंत	७वी अ
कु. सुबोध श्रीधर कुलकर्णी	७वी अ

गट क्र.२

कु. श्रध्दा विकास बर्गे	९वी अ
कु. शिवांगी जिर्गेश पांडे	९वी अ

दि. ३१.७.२०१९ रोजी माजी विद्यार्थी मंडळाने आयोजित केलेल्या गीता पाठांतर स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

गट क्र. १ (इंग्रजी माध्यम)

कु. प्रज्ञा विनायक वारंग	६वी
कु. अनुष्का दत्तात्रय गोपाळे	५वी
कु. यश सचिन रसाळ	५वी

गट क्र. २

कु. शुभ्रा संजय सावंत	७वी
कु. भूमी कमलाकर देसाई	७वी

गीता मराठी पाठांतर स्पर्धा

कु. अनुष्का संदीप गावडे	६वी
कु. वेदांत पराग दीक्षित	८वी

पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी
मुख्याध्यापक श्री. गणेश सुदाम कणसे

गणेशोत्सव

शुक्रवार दि ३०.८.२०१९ रोजी शाळेच्या सभागृहात गणपतीच्या अष्टविनायक रुपांचे दर्शन आयोजित केले होते. सभागृहात विविध वस्तूंचे सुशोभन करुन सजावट केली होती. त्याच दिवशी मातृदिन असल्याने प्रतिनिधी स्वरुपात काही मातांना बोलावून त्यांच्या मुलांकडून त्यांची आरती व पाद्य पूजन करुन घेतले. लेझीमच्या तालावर गणपतीची मिरवणूक काढली. मुलांना बुंदीचे लाडू प्रसाद म्हणून वाटले. मुलांनी गणपतीच्या गाण्यावर नृत्य सादर केले.

नवरात्रोत्सव

दि. ८.१०.२०१९ रोजी इ. ३री व ४थी च्या प्राथमिक मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी आणि दि. ९.१०.२०१९ रोजी इ. १ली आणि २री च्या विद्यार्थ्यांनी नवीन रंगीत कपडे परिधान करुन शाळेच्या सभागृहामध्ये नवरात्रोत्सवाचा गरबा आणि दांडियाचा मनसोक्त आनंद लुटला. मुलांच्या सोबतीला शिक्षकांनी ही फेर धरला.

सोमवार दि. ७.१०.२०१९ रोजी इ. १ली ते ४ थीच्या मुलांनी पाटीपूजनाचा कार्यक्रम केला. सरस्वतीचे चित्र काढून त्यांची मनोभावे सर्वांनी पूजा केली. प्रसन्न वातावरणात वर्गावर्गातून सरस्वती पूजन करण्यात आले.

विद्याभवन माध्यमिक मराठी
मुख्याध्यापिका सौ. योगिनी राजेंद्र पोतदार

तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धा

जिल्हा क्रीडा परिषद, मुंबई उपनगर आयोजित तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. १४ व १७ वर्षामधील मुले व मुलींच्या गटांतील पारितोषिके प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

सुर्वणपदक प्राप्त व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी

कु. गायत्री दत्तात्रय बिनवडे, कु. प्राची शहाजी नलवडे, कु. नम्रता दिगंबर कांबळे कु. अथर्व दत्तात्रय बिनवडे, कु. मयुरेश महेंद्र मटाले

कांस्यपदक प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे

कु. अविष्कार धनश्याम शिंदे, कु. रोहन राजाराम पोवार, कु. क्षितिज शशांक वाघांबरे

जिल्हा स्तरीय कुस्ती व तायक्वांदो स्पर्धा

जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर आयोजित जिल्हास्तरीय कुस्ती व तायक्वांदो स्पर्धेत विद्याभवन हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करुन अनेक पारिताषिके प्राप्त केली. पारितोषिक प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे

कुस्ती (ग्रीको रोमन)

विद्यार्थ्याचे नाव	पदक	निवड
कु. विश्वजीत पाटील	सुवर्ण	विभागीय स्तरावर
कु. अथर्व वाघमोडे	कांस्य	

तायक्वांदो स्पर्धा

कु. गायत्री बिनवडे	सुवर्ण	विभागीय स्तरावर
कु. प्राची नलवडे	सुवर्ण	विभागीय स्तरावर
कु. नम्रता कांबळे	कांस्य	
कु. अथर्व बिनवडे	सुवर्ण	विभागीय स्तरावर
कु. मयुरेश मटाले	रौप्य	

L.I.C. गुणगौरव समारंभ

बुधवार दि. २५.९.२०१९ रोजी प्रशालेतील इ. ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांमधील आदर्श व गुणवंत विद्यार्थ्यांना L.I.C. of India घाटकोपर तर्फे सन्मानचिन्हे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पुरस्कार प्राप्त विद्यार्थी

कु. अनिकेत सोमनाथ आमले	५वी अ
कु. कोमल तुषार तोत्रे	६वी अ
कु. ईश्वरी विजय देसाई	७वी क
कु. दिवेश दीपक जाधव	८वी क
कु. प्रज्वल सुदाम सांगळे	९वी क
कु. मानसी रमेश आव्हाड	१०वी ब

सदर कार्यक्रमास L.I.C. चे अधिकारी, ज्येष्ठ संचालक श्री. के. एन. शिरकांडे, संचालक श्री. दिनेश मिसाळ, सर्व विभागाचे मुख्याध्यापक, समन्वयक सौ. सरला नरेंद्रन

सहा. शिक्षक श्रीमती अनघा सावंत, श्री. अर्जुन मस्के उपस्थित होते.

मुंबई विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धा

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पालघर व वसई, विरार शहर महानगरपालिका आयोजित मुंबई विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करुन अनेक पारितोषिके मिळविली. पारितोषिक प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे

विद्यार्थ्याचे नाव	गट	पदक
कु. अथर्व द. बिनवडे	१४ वर्षाखालील	सुवर्ण
कु. गायत्री द. बिनवडे	१७ वर्षाखालील	सुवर्ण

या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

एन् वॉर्ड स्तरीय सहशालेय उपक्रम

शिक्षक निरीक्षक बृहन्मुंबई उत्तर विभाग आयोजित वॉर्डस्तरीय सहशालेय उपक्रमांतर्गत विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी करुन पुढील स्पर्धांमध्ये पारितोषिके प्राप्त केली.

स्पर्धा	विद्यार्थ्याचे नाव	इयत्ता	गट	क्रमांक
एकपात्री	कु.स्नेहल माने	६वी अ	लहान	तृतीय
वक्तृत्व	कु.मानसी आवाड	१०वी ब	मोठा	प्रथम
लोकनृत्य (समुह)				तृतीय

राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल गोंदिया येथे ३ ते ६ ऑक्टोबर २०१९ या कालावधीत पार पडल्या. सदर स्पर्धेत विद्यार्थी कु. अथर्व दत्तात्रय बिनवडे ८वी ब याने कांस्यपदक पटकाविले.

प्राथमिक इंग्रजी
मुख्याध्यापिका सौ. शुभांगी जाधव

L.I.C. बेस्ट स्टुडंट अवॉर्ड

या वर्षाचे L.I.C. बेस्ट स्टुडंट अवॉर्ड २०१८-२०१९ हे पारितोषिक कु. अनुष्का कांबळे - इ. १ली, कु. ऐश्वर्या करगुटकर - इ. २री, कु. श्रीया डिगराजकर इ. ३री, तसेच कु. आर्यन शेंडे - इ. ४थी या मुलांना प्रदान करण्यात आले. हे पारितोषिक दि. २५ सप्टेंबर २०१९ रोजी देण्यात आले. या पारितोषिकासाठी निवड करतेवेळी मुलांमधील सर्वगुण संपन्नता, शालेय व आंतरशालेय स्पर्धांमधील त्यांचा सहभाग, त्यांचे इतर विद्यार्थ्यांबरोबरचे संबंध, त्यांचे वर्तन अशा महत्वपूर्ण घटकांची तपासणी करण्यात आली.

एन.बी.ए (नॅशनल बास्केटबॉल ॲकेडमी) ला भेट

दि. ८ आक्टोबर २०१९ रोजी इयत्ता ३री व ४थीतील विद्यार्थ्यांना वरळी येथे एन्.बी.ऐ. (नॅशनल बास्केटबॉल ॲकेडमी) तर्फे आयोजित केलेल्या स्पर्धा बास्केटबॉल या खेळात वापरली जाणारी विविध कौशल्ये आत्मसात केली व खेळाचा आनंद लुटला. ***

विज्ञान महाविद्यालय, पुणे

संचालक : प्रा. राजेंद्र सं. कांबळे
प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड

महाविद्यालयास नॅक समितीकडून बी दर्जा प्राप्त

बंगळुरु येथील राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषद (नॅक) समितीने दि. १६ व १७ सप्टेंबर २०१९ रोजी महाविद्यालयास भेट देऊन मूल्यांकन केले. महाविद्यालयास नॅक समितीकडून बी दर्जा प्रथम फेरीमध्ये प्राप्त झाला आहे.

या भेटी दरम्यान समितीने महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रम, भौतिक सोयी सुविधा, नवीन उपक्रम, विद्यार्थ्यांची प्रगती, प्रशासकीय बाबी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक वर्ग यांच्याशी संवाद साधून अनेक बाबींची पडताळणी केली. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी नॅक समितीचे स्वागत केले. आयक्यूअेसी समन्वयक डॉ. स्वाती जोशी यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. सुरेखा देशमुख, प्रा. नीता रानभरे, प्रा. रमाकांत भुजबळ, प्रा. शिल्पा पवळे, प्रा. प्रियांका खुटवड, ग्रंथपाल प्राजक्ता लोकुर आदींनी नॅक पीअर टीमच्या भेटी दरम्यान कामकाज पाहिले. या मुल्यांकनाच्या सर्व प्रक्रियेमध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंदाने बहुमुल्य योगदान केल्यामुळे मुल्यांकन प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करता आली. ***

विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,नेरूळ,नवी मुंबई शाखा

कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे
संचालक : श्री. दिनेश मिसाळ
संचालक : डॉ. शं. पां. किंजवडेकर

प्राथमिक मराठी
मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ

पालकांसाठी व्याख्यान

दि. ३१.८.२०१९ रोजी पालकांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळ वृत्तपत्र समूहातर्फे 'खाऊचा डबा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी आहार तज्ञ डॉक्टर मीनाक्षी कुऱ्हे या उपस्थित होत्या. याप्रंसगी संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर, मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ, शिक्षक वृंद व मोठ्या प्रमाणात पालक वर्ग उपस्थित होता. लहान मुलांना उपाशी पोटी न ठेवता दिवसभर काही काही अंतराने जेवण देणे आवश्यक आहे. त्यातच लहान मुलांच्या खाण्याच्या वेळा पाळणे आवश्यक असून अतिरिक्त मैद्याचे पदार्थ, साखर व मीठ यांचे अतिसेवन टाळावे. 'मैद्यापासून बनवलेले पदार्थ खाणे, म्हणजेच आजार होणे' असा अर्थ असल्याचा सल्ला आहार तज्ञ डॉक्टर मीनाक्षी कुऱ्हे यांनी दिला. 'खाऊचा डबा' या व्याख्यानातून विद्यार्थ्यांच्या पालकांनाही उत्तम मार्गदर्शन मिळाले, तसेच या विषयी प्रबोधन होत असून मुलांचे आरोग्य सुदृढ होण्यास मदत होईल अशी अपेक्षा संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्रतिभा आहेर यांनी केले व सौ. देविका आमले यांनी आभार व्यक्त केले.

अभिनंदनीय वार्ता

नवी मुंबई शिक्षण संकुल आयोजित 'शिक्षक सन्मान सोहळा' दि. १३.९.२०१९ रोजी शिक्षक दिनानिमित्त संचालक श्री.दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सौ. श्रीजा नायर, सौ. मनिषा मुळीक, मुख्याध्यापक श्री. शिवाजी माळी, शिक्षक श्री. अविनाश कुलकर्णी, श्री. रमेश राऊत, श्री. दत्तात्रय आटपाडकर, श्री. सुजय वाबळे, शिक्षिका सौ. कविता तेंडुलकर, सौ. प्रीती वाघ व सौ. ममता राक्षे यांना, लोकनेते मा. श्री. गणेशजी नाईक यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सोबत आमदार श्री. संदीप नाईक व इतर मान्यवर उपस्थित होते. अण्णासाहेब पाटील स्मृतीभवन, कौपरखैरणे, नवी मुंबई येथे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

जिल्हा स्तरीय कुस्ती स्पर्धेत यश



कु. मंथन साळुंके

क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरशालेय कुस्ती स्पर्धेत ५० किलो वजनी गटात कु. मंथन साळुंके इ. ७वी मधील विद्यार्थी विजयी झाला असून विभागीय पातळीवर त्याची निवड करण्यात आली आहे.

माध्यमिक इंग्रजी
मुख्याध्यापिका सौ. श्रीजा नायर

रक्षाबंधन

विश्व बालक केंद्र नेरुळ येथे दि. १५.८.२०१९ रोजी रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी विश्व बालक केंद्रातील युथ सेंटर मधील मुलांना राख्या बांधल्या, तसेच त्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तेथील विद्यार्थ्यांना अल्पोपहार दिला. विद्यार्थी प्रतिनिधी कु. सोहम दिनेश मिसाळ याने संस्थेविषयी माहिती सांगितली. श्री. गणेश शेळके व श्री संतोष सुर्वे यांनी विश्व बालक केंद्र, तेथील परिसर व त्याच्या माध्यमातून चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, विद्यार्थी व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

अभिनंदन वार्ता

टिळक ग्रुप ऑफ स्कूलस् ॲड कॉलेजेस आयोजित आंतरशालेय टॅलेंट हंट स्पर्धेमध्ये दि. ३१.८.२०१९ रोजी टिळक इंटरनॅशनल स्कूल, घणसोली येथे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये खालील

विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

विद्यार्थ्यांचे नाव	इ / तु	प्राप्त क्रमांक	स्पर्धा
कु. वेदांत भाईर	६वी / अ	प्रथम	गायन
कु. रिदा पटवेगर	७वी / अ	प्रथम	वक्तृत्व
कु. नंदिनी मैती	७वी / ब	प्रथम	नृत्य

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या व शाळेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

शिक्षक दिन

दि. ५ सप्टेंबर २०१९ रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळपासून इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेचे कामकाज पाहिले. अगदी प्रार्थनेपासून ते शाळा सुटेपर्यंत विद्यार्थी शिक्षकांच्या भूमिकेत होते. वर्गावर जाऊन विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून विद्यार्थ्यांना विषयांचे मार्गदर्शन केले. शाळेच्या सभागृहात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन माध्यमिक मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर यांच्या हस्ते करण्यात आले.विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर विविध कविता सादर केल्या व शिक्षक दिनाची माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यार्थ्यांनी केले.

प्रशिक्षण

'ब्रीज फायर सेफ्टी अँड इक्विपमेंट' यांमार्फत आग विझविण्याचे प्रशिक्षण दि. १४.९.२०१९ रोजी सर्व शिक्षकवृंद शिक्षकेतर कर्मचारी यांना श्री. बी. एम. सिंग व श्री. कुंदन तिवारी यांनी दिले. याप्रसंगी संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर व श्रीमती मनिषा मुळीक, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्राथमिक इंग्रजी
मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळीक

परिवहन सभा

दि. १७ सप्टेंबर २०१९ रोजी शालेय परिवहन समितीची पहिली सभा आयोजित करण्यात आली. या सभेसाठी पोलिस नाईक श्री. नितीन वडाळ, श्री. चंद्रकांत जाधव, संचालक श्री. दिनेश मिसाळ, सर्व विभागांचे मुख्याध्यापक, शिक्षक व बसने येणाऱ्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. सभेमध्ये वहातुकीचे नियम, मुलांची सुरक्षितता व पालकांची कर्तव्ये या विषयांवर श्री. चंद्रकांत जाधव व श्री. नितीन वडाळ यांनी सर्वांसोबत चर्चा केली व शंकांचे निरसन केले. सभेचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी केले व मुख्याध्यापक श्री. शिवाजी माळी यांनी उपस्थितांचे आभार मानले. ***

महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे
प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे

बालदिन साजरा

गुरुवार दि. १४.१.२०१९ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त बालदिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे ठाणे जनता सहकारी बँक, सदाशिव पेठ शाखेचे शाखाधिकारी श्री. भोईर आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षक श्री. ज्ञानेश्वर दाते, विद्यार्थी कु. शिवम वखरे इ. १० आणि कु. शंकर गिलबिले इ.८ वी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याविषयी माहिती सांगितली. श्री. भोईर यांनी विद्यार्थ्यांना बालदिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि बँकेमध्ये 'शून्य बॅलन्स खाते' सुविधा उपलब्ध आहे त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी पंडित जवाहरलाल नेहरू लहान मुलांमध्ये कसे रमायचे, त्यांच्या जीवनातील घटना सांगून त्यांच्या चरित्राची माहिती दिली. बालदिनाच्या निमित्ताने शिक्षक श्री. युवराज मिरखलकर यांनी सुरेख फलकलेखन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. आभार प्रदर्शन शिक्षिका सौ. अरुणा सूर्यवंशी यांनी केले. बालदिनानिमित्त सर्व शिक्षकांतर्फे विद्यार्थ्यांना पेन आणि ठाणे जनता सहकारी बँकेतर्फे चॉकलेट देण्यात आले. ***

मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

कार्यवाह : प्रा. राजेंद्र कांबळे
प्र. प्राचार्या : सौ. हेमांगिनी इनामदार
प्र. मुख्याध्यापिका : सौ. उत्कर्षा केणी

पूर्व-प्राथमिक विभाग

वक्तृत्व स्पर्धा

दि. २० सप्टेंबर २०१९ रोजी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. 'माझा आवडता प्राणी' या विषयांवर मुले अतिशय आत्मविश्वासाने बोलली. सौ. नेहा खोपकर व सौ. सोनाली नेसरीकर या प्राथमिक शिक्षकांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

पालक शाळा

दि. ३०.९.२०१९ रोजी 'पालक शाळा' आयोजित केली होती. प्रत्येक विभागाच्या शिक्षिकांनी प्रथम सत्र परीक्षेचा अभ्यासक्रम व्यवस्थित समजावून सांगितला. अभ्यास कसा घ्यावा? हे ही समजावून सांगितले. समुपदेशज्ञ सौ. मधुरा काळे यांनी पालकांना मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी काही महत्त्वाच्या सूचना दिल्या.

इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा

दि. १.१०.२०१९ रोजी सिनिअर के. जी. गटासाठी 'इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचा विषय 'पाळीव प्राणी' हा होता. या स्पर्धेला मुलांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. परीक्षक म्हणून सौ. रेखा बाली व सौ. केतकी पुजारी यांनी काम पाहिले.

प्राथमिक विभाग

इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा प्रथम फेरी दि. १७ सप्टेंबर २०१९ रोजी वर्गात घेण्यात आली. तर अंतिम फेरी दि. २३.९.२०१९ रोजी घेण्यात आली.

माध्यमिक विभाग

दि. २१ सप्टेंबर रोजी 'नाट्यवाचन स्पर्धा' पार पडली. टिळक कुलाने प्रथम तर बोस कुलाने द्वितीय क्रमांक पटकावला.

कु. अस्मा जामदार (इयत्ता ६ वी इ) या विद्यार्थिनीने दि. ७ सप्टेंबर २०१९ रोजी झालेल्या 'पुणे फेस्टिवल बॉक्सिंग टूर्नामेंट' मध्ये भाग घेतला व सुवर्णपदक मिळविले.

कु. शार्दुल देशमुख (५ वी अ) याने १५ सप्टेंबर २०१९ रोजी झालेल्या जिल्हा पातळीवरील 'कराटे चॅम्पियनशिप' मध्ये भाग घेतला. त्या स्पर्धेत त्याने रजत पदक जिंकले.

N.C.C. च्या विद्यार्थिनींनी सप्टेंबर मध्ये झालेल्या CATC कॅम्पमध्ये विविध बक्षीसे जिंकली ती पुढीलप्रमाणे

१) नृत्य - ट्रॉफी
२) कवायत - दुसरा क्रमांक
३) वैयक्तिक कार्यक्रमामध्ये कु. सानिया रासकर (इयत्ता ९ वी क) हिने सुवर्णपदक प्राप्त केले.

माहे सप्टेंबर मध्ये 'Muktangan Exploratory Science Centre' कोथरुड यांनी आयोजित केलेल्या 'Poster Making' स्पर्धेत कु. आदित्य कुलकर्णी (इयत्ता १० वी ब) याने उत्तेजनार्थ बक्षीस व प्रमाणपत्र मिळवले.

दि. ३० व ३१ ऑगस्ट २०१९ या दिवशी कलमाडी हायस्कूल, कोथरूड येथे 'Student Leadership Council' ही नेतृत्वगुणांवर आधारित विविध कार्यक्रम असलेली कार्यशाळा घेण्यात आली. मुक्तांगण शाळेतील विद्यार्थी - प्रतिनिधींनी या कार्यशाळेला हजेरी लावली. पुण्यातील १७ शाळा यात सहभागी झाल्या होत्या.

दि. १६ सप्टेंबर २०१९ रोजी शाळेतील ४ कुलांमध्ये 'प्रश्नमंजूषा' स्पर्धा आयोजित केली गेली. टिळक कुलाने प्रथम तर बोस कुलाने द्वितीय क्रमांक मिळविला.

'District Level Interact Assembly' हा कार्यक्रम दि. २१ सप्टेंबर २०१९ रोजी फातिमानगर, वानवडी येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात पुणे, रायगड व पनवेल जिल्ह्यातील शाळांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून पहिल्या महिला ''Sky diver'' शीतल महाजन

उपस्थित होत्या. मुक्तांगण शाळेतील इंटरॅक्ट क्लबचे विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांनी दि. १६ व १७ सप्टेंबर २०१९ रोजी 'नॅशनल फिल्म इन्स्टिट्यूट' पुणे येथे जर्मन संस्था 'PASCH' ने आयोजित केलेल्या 'Film Festival' ला हजेरी लावली व जर्मन भाषा शिकण्यासाठी उपयुक्त अशा चित्रपटांचा आनंद घेतला.



श्री. संजय गिते

माहे सप्टेंबरमध्ये शारीरिक शिक्षण विषय शिक्षक श्री. संजय गिते यांना 'Teacher's Democratic Front' विभाग यांच्या तर्फे 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. संस्थेतर्फे त्यांचे अभिनंदन !

इयत्ता ९ वी व १० वी च्या माहे सप्टेंबरमध्ये विविध शालेय विषयांच्या प्रश्नपत्रिकांच्या बदललेल्या स्वरूपविषयी च्या व मूल्यमापनाच्या कार्यशाळांना शाळेतील अनेक विषय - शिक्षिकांनी हजेरी लावली.

इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'संस्कृतवार्ता वाचन स्पर्धा' दि.४ ऑक्टोबर २०१९ रोजी घेण्यात आली.

या स्पर्धेत कु. साक्षी भामरे (इयत्ता १० अ) हिने पहिला तर कु. ऋतुपर्ण रानडे (इयत्ता ८ वी अ) याने दुसरा क्रमांक मिळवला.

दि. ३ ऑक्टोबर २०१९ रोजी आयोजित 'मराठी गीत गायन' स्पर्धेत कु. समृद्धी वंजारे (इ. ६ वी अ) हिने प्रथम, तर कु. समीक्षा गायकवाड (इ. ७ वी क) हिने द्वितीय क्रमांक मिळविला.

दि. ३० सप्टेंबर २०१९ रोजी इयत्ता ५ वी व ६ वी च्या वर्गशिक्षिकांनी त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांना 'पालक शाळा' उपक्रमाची माहिती दिली. या उपक्रमांतर्गत पालकांना त्यांच्या पाल्याच्या सर्वांगीण विकास, व्यक्तिगत स्वच्छता, स्वयंशिस्त, अभ्यासाबद्दल जागरुकता या विषयी प्रबोधन केले. प्राचार्या सौ. हेमांगिनी इनामदार, समन्वयक श्रीमती नूतन नेऊरगांवकर यांनी सर्व वर्गात जाऊन पालकांची भेट घेतली व संवाद साधला.

कु. सानिया कदम (इयत्ता ८ वी इ) या विद्यार्थिनीने दि. २ ऑक्टोबर २०१९ रोजी इंद्रायणीनगर, भोसरी येथे झालेल्या 'NIOJAM Selection meet २०१९' मध्ये भाग घेतला. त्यात तिने ६०० मी. धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. 'Pune District School's Atheletics meet २०१९' मध्ये तिने ६०० मीटर व ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत भाग घेतला. बारामती येथे भरणाऱ्या विभागीय स्पर्धासाठी तिची निवड झाली आहे.

दत्तवाडी पोलीस स्टेशनला भेट

दि. ५.१०.२०१९ रोजी 'पोलिस स्टेशन भेट' 'पोलीस आपले मित्र' हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात शाळेच्या इंटरॅक्ट क्लब Select cleanliness committee व शाळेचे विद्यार्थी प्रतिनिधी यांनी भाग घेतला. विद्यार्थ्यांनी पोलिसांशी संवाद साधला व पोलिस स्टेशनमधील दैनंदिन कामकाज, येणाऱ्या समस्या व आव्हाने याबद्दल पोलीसकाका दत्तवाडी पोलीस स्टेशनचे प्रमुख श्री. देविदास घेवारे यांनी माहिती दिली.

पुण्यातील पूरसदृश्य परिस्थितीची ज्या विद्यार्थ्यांना झळ सोसावी लागली, त्यांच्यासाठी मुंबईतील एका समाजिक संस्थेने स्कूलबॅग्स आणि लेखनसाहित्य देऊन मदतीचा हात पुढे केला. सदर साहित्याचे वाटप दि. ९ ऑक्टोबर २०१९ रोजी शाळेच्या प्राचार्या सौ. इनामदार व शाळेच्या समन्वयक श्रीमती नेऊरगांवकर यांनी केले. आठवण ठेवून विद्यार्थ्यांना मदत केल्याबद्दल संस्था आभारी आहे.

दि. ३०.९.२०१९ रोजी मुक्तांगण शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागासाठी 'पालक शाळा' आयोजित केली होती.

मुक्तांगण शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागातील सिनिअर के. जी. साठी इंग्रजी 'वक्तृत्व स्पर्धा' आयोजित केली होती.

***

विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,नेरूळ,नवी मुंबई शाखा

कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे
संचालक : श्री. दिनेश मिसाळ
संचालक : डॉ. शं. पां. किंजवडेकर

ज्येष्ठ नागरिक दिन

दि. २८ सप्टेंबर २०१९ रोजी पूर्व प्राथमिक इंग्रजी व सेमी इंग्रजी विभागाकडून 'ज्येष्ठ नागरिक दिन' साजरा करण्यात आला. दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन पुणे विद्यार्थी गृह, माजी विद्यार्थी मंडळ मुंबई विभागाकडून केले जाते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती निर्मला भांडारकर (माजी सहशिक्षिका, विद्याभवन, घाटकोपर) व श्री. अरविंद वाळवेकर, नेरुळ ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष यांना आमंत्रित करण्यात आले होते. सौ. अस्मिता सलगर यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करुन दिला. शिक्षकांनी आजी-आजोबांचे स्वागत शुभेच्छा पत्रके देऊन केले व त्यांना अल्पोपहार देण्यात आला. संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी प्रमुख अतिथी श्रीमती निर्मला भांडारकर यांना श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन त्यांचे स्वागत व सत्कार केला. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी प्रमुख अतिथी श्री. अरविंद वाळवेकर यांना श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठांना योग्य ती पेन्शन मिळावी म्हणून सतत प्रयत्नशील आहोत, असे विचार मांडले. त्यानंतर ज्येष्ठांसाठी आयोजित केलेल्या खेळांना सुरवात करण्यात आली. बादलीत चेंडू टाकणे व संगीत खुर्ची या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. सौ. प्रतिभा आहेर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अस्मिता सलगर यांनी केले.

पूर्व-प्राथमिक इंग्रजी विभाग

ऑरेंज डे

दि. ११.०९.२०१९ रोजी ऑरेंज डे साजरा करण्यात आला. या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी नारंगी रंगाचे कपडे परिधान केले होते. विद्यार्थ्यांना नारंगी रंगाच्या विविध वस्तूंची ओळख करुन देण्यात आली. याचकाळात गणेशोत्सव असल्यामुळे शाळेच्या सभागृहामध्ये गणेशाचे पूजन करण्यात आले व नंतर सर्व विद्यार्थ्यांनी गणपती स्तोत्राचे पठण केले. बुद्धीची देवता श्रीगणेशाचे आशीर्वाद घेतले.

माध्यमिक मराठी आणि कनिष्ठ महाविद्यालय
मुख्याध्यापक श्री. शिवाजी माळी

डिजिटल थिंकिंग या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

दि. २० सप्टेंबर २०१९ रोजी डिजिटल थिंकिंग विषयी तरुणांशी संवाद साधणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन सकाळच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्कतर्फे (यिन) नेरुळ येथील तेरणा सभागृहामध्ये करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी विद्याभवन उच्च माध्य. विभागातून २१० विद्यार्थ्यांसह शिक्षकवृंद व मुख्याध्यापक श्री शिवाजी माळी हे देखील उपस्थित होते. यावेळी प्रमुख वक्ते श्री. पीयूष भामरे व श्री. शलभ सहाय यांनी आपल्या दैनंदिन जीवनात डिजिटल व्यासपीठाचा प्रभावी वापर करत त्याचे महत्व स्पष्ट केले. स्मिक डॉट कॉमचे सिईओ श्री. पीयूष भामरे यांनी हेल्थ केअर इन डिजिटल स्पेस या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तर 'सोशल रिस्पॉन्सिबिलिटी इन डिजिटल एज' या विषयावर बोलताना श्री. शलभ सहाय यांनी एज्युकेट गर्ल्स या संस्थेचे उदाहरण देऊन ई-व्हॉलेंटिअर्स बनण्याचे आवाहन केले. सदर कार्यक्रमाला संचालक श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक व प्राध्यापक आदि उपस्थित होते.

व्याख्यान

दि. २१ सप्टेंबर २०१९ रोजी इ. १०वीतील विद्यार्थ्यांसाठी श्री. जगतराव पाटील यांचे विविध अभ्यासपध्दतींवर व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी स्मरणशक्ती, कुवत, क्षमता गरज, मानसिक विस्मरणाची प्रक्रिया यांची विद्यार्थ्यांना जाणीव करुन दिली. मुख्याध्यापक श्री शिवाजी माळी यांनी व्याख्यात्यांचे आभार मानले.

करिअर जागृती शिबिर

इ. ९ वीतील विद्यार्थ्यांसाठी अंतरंग फाऊंडेशन तर्फे

श्री. सुनिल मकरे आणि श्रीमती अश्विनी सुर्वे या प्रतिनिधींनी दि. ३०.८.२०१९ ते ४.९.२०१९ या कालावधीत करिअर जागृती शिबिर घेतले. या शिबिरात विद्यार्थ्यांना अभिरुची, अभिक्षमता,व्यक्तिमत्व, वास्तव, भविष्यातील संधी, करिअरचे नियोजन याविषयी जाणीव करुन दिली. या पाच दिवस चाललेल्या शिबिराच्या समारोप समारंभात मुख्याध्यापक श्री. शिवाजी माळी यांनी श्री. मकरे आणि श्रीमती सुर्वे यांचे शाळेच्या वतीने आभार मानले.

गरबा नृत्य

शनिवार दि. ५.१०.२०१९ रोजी विद्यार्थ्यांसाठी गरबा नृत्याचे आयोजन करण्यात आले होते. पारंपारिक पोशाख परिधान करुन विद्यार्थ्यांनी गरबा नृत्याचा आनंद लुटला.

वाचन प्रेरणा दिन

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संचालक श्री. दिनेश मिसाळ उपस्थित होते. यावेळी संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे महत्त्व पटवून सांगितले. ते म्हणाले, पुस्तकासारखा दुसरा मित्र नाही. हाच मार्ग तुम्हाला यशाच्या शिखरावर घेऊन जाईल. नेहमी पुस्तके वाचा, भविष्यात तुमचा यशाचा मार्ग कोणीच रोखू शकत नाही. दिवाळीत फटाक्याऐवजी आवडीचे पुस्तक विकत घेऊन वाचा. दुपारच्या सत्रात विद्याभवन उच्च माध्यमिक विभागामध्ये संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर, श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. शिवाजी माळी व श्रीमती सुवर्णा मिसाळ उपस्थित होत्या.

महात्मा गांधी जयंती

विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमास सुरुवात झाली. या दिनाचे औचित्य साधून गांधीजींच्या जीवनातील प्रसंग गोष्टीच्या रुपाने व स्वच्छता विषयी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. कार्यक्रमाअखेर स्वच्छतेविषयी प्रतिज्ञा घेण्यात आली आणि उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळा व शालेय परिसर स्वच्छ केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अविनाश कुलकर्णी यांनी व आभारप्रदर्शन श्रीमती राजकुमारी इंदलकर यांनी केले.

प्राथमिक इंग्रजी
मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळीक

महात्मा गांधी जयंती

विद्याभवन शाळा नेरुळ येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास माध्यमिक व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमास सुरुवात झाली. या दिनाचे औचित्य साधून श्रीमती मनिषा मुळीक यांनी गांधीजींच्या जीवनातील प्रसंग गोष्टीच्या रुपाने विद्यार्थ्यांना सांगितले. शिक्षिका श्रीमती सुप्रवा मोहंती व श्रीमती रत्ना सिंग यांनी सत्य, अहिंसा, श्रमप्रतिष्ठा, धर्मनिरपेक्षता इ. मूल्यांची जोपासना करणारे गांधीजी आणि त्यांची शिकवण विद्यार्थ्यांना सांगितली. कार्यक्रमाअखेर स्वच्छतेविषयी प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती ममता राक्षे यांनी व आभारप्रदर्शन श्रीमती राखी लोणकर यांनी केले.

रासदांडिया

दि. ३ ऑक्टोबर २०१९ रोजी नवरात्री निमित्त गरबा व रास दांडियाचे आयोजन करण्यात आले. इ. १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांनी रंगीत कपडे परिधान करुन गरबा व दांडिया यांचा आनंद लुटला.

माध्यमिक इंग्रजी
मुख्याध्यापिका सौ. श्रीजा नायर

रासदांडिया / गरबा

दि. ४.१०.२०१९ रोजी नवरात्रीचे औचित्य साधून इ. ५वी ते १०वीतील विद्यार्थ्यांसाठी गरबा नृत्याचे आयोजन करण्यात आले. या दिवशी विद्यार्थी पारंपारिक वेशभूषेत आले होते. सर्व विद्यार्थी, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला.

वाचन प्रेरणा दिन

वाचन प्रेरणा दिन दि. १५ ऑक्टोबर २०१९ रोजी डॉ. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगितले व येणाऱ्या दिवाळीमध्ये फाटके न घेता पुस्तके घेण्याचे व त्यांचे वाचन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती रत्ना सिंग यांनी केले.

प्राथमिक मराठी
मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ

महात्मा गांधी जयंती

दि. २ ऑक्टोबर २०१९ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती मोठ्या उत्साहाने साजरी केली. सदर कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ, इ. ५वी ते ७वीचे सर्व विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते. मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा मिसाळ यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या भाषणातून निरोगी आरोग्याचे व स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. आपले जीवन शिस्तप्रिय पद्धतीने जगावे याविषयी मार्गदर्शन केले.

नवरात्र उत्सव दसरा आणि सरस्वती पूजन

मराठी विभागाने नवरात्रीनिमित्त रास दांडियाचे आयोजन केले होते. विद्यार्थी रंगीत कपड्यांमध्ये या कार्यक्रमास उपस्थित होते. इ. १ते ४थीच्या विद्यार्थ्यांनी या प्रसंगी सरस्वतीपूजन केले. स्वत: फूलमाळा तयार करुन पाटीपूजन केले. विद्यार्थ्यांनी एका तालात गरबा नृत्य व टिपऱ्यांच्या खेळाचा आनंद लुटला. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

गुरुवर्य दादासाहेब केतकर पुण्यतिथी

दि. १६ ऑक्टोबर २०१९ रोजी गुरुवर्य दादासाहेब केतकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यस्मरण करण्यात आले. या प्रसंगी संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर व श्री. दिनेश मिसाळ, सर्व विभागाचे मुख्याध्यापक, सकाळ वृत्तपत्र समूहाचे संपादक श्री. अतुल शेगावकर, सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात गुरुवर्य दादासाहेब केतकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. प्राथमिक मराठी विभागातील सौ. मेघाराणी जोशी, प्राथमिक इंग्रजी विभागातील श्री संकेत थळे, माध्यमिक मराठी विभागातील श्री अविनाश कुलकर्णी, माध्यमिक इंग्रजी विभागातील श्री. रमेश राऊत या शिक्षकांनी आपल्या भाषणातून दादासाहेबांच्या पुण्य स्मृतीस उजाळा दिला. या कार्यक्रमात संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी दादासाहेबांच्या आठवणी सांगत त्यांच्या समवेत घालविलेल्या विविध प्रसंगांना शब्दरुप दिले. तसेच संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी दादासाहेबांच्या दातृत्व गुणाची आठवण करुन दिली. तसेच पुणे विद्यार्थी गृह ३६५ दिवस भोजन व्यवस्थेबाबत माहिती सांगितली. या अंतर्गत त्यांनी संस्थेच्या हितचिंतक व देणगीदार यांना पुणे विद्यार्थी गृहाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी देणगी देण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कविता तेंडुलकर यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. राधिका भोसले यांनी केले. ***


डॉ.शं.पां.किंजवडेकर

अभिनंदनीय

डॉ. शं. पां. किंजवडेकर यांना 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान

दि. १० नोव्हेंबर २०१९ रोजी स्पोर्टस क्लब, कल्याण, येथे डॉ. शं. पां. किंजवडेकर यांना त्यांच्या वैद्यकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल '**जीवनगौरव पुरस्कार**' देऊन गौरविण्यात आले. नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशनच्या कल्याण शाखेने निमाकॉन २०१९ कॉन्फरन्स आयोजित केली होती. असोसिएशनचे अखिल भारतीय अध्यक्ष डॉ. विनायक टेंबुर्णीकर यांनी डॉ. किंजवडेकर यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व आकर्षक स्मृतिचिन्ह देऊन पुरस्कार प्रदान केला. *

कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

संचालक : श्री. अमोल जोशी **मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

महात्मा गांधी जयंती, लालबहादूरशास्त्री जयंती आणि कै. काकासाहेब देशमुख पुण्यतिथी कार्यक्रम

मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा गांधी जयंती, लालबहादूरशास्त्री जयंती व आणि कै. काकासाहेब देशमुख पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला. मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी प्रतिमापूजन करुन अभिवादन केले. शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी या तिघांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. विद्यार्थ्यांनीही भाषणे सादर केली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनीही महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांचे बालपण, शिक्षण, भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कार्याविषयी माहिती सांगितली. श्री. तुकाराम मंडले यांनी आभार मानले.

वाचन प्रेरणा दिन

दि. १५.१०.२०१९ रोजी माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकांनी प्रतिमापूजन करुन अभिवादन केले. श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व आणि डॉ. कलाम यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. विद्यार्थ्यांनी पुस्तकांचे वाचन करुन हा दिवस साजरा केला.

प्रकाशयुक्त दिवाळी, फटाकेमुक्त दिवाळी

दि. १८.१०.२०१९ रोजी '**प्रकाशयुक्त दिवाळी, फटाकेमुक्त दिवाळी अभियान**' राबविण्यात आले. शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी 'प्रदूषणमुक्त दिवाळी' कशी साजरी करावी, पर्यावरण पूरक स्वदेशी वस्तूंचा वापर करुन पर्यावरण संतुलनास हातभार कसा लावावा, फटाके न उडविता बचत केलेल्या पैशाचा विनियोग कसा करावा याविषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. सर्व विद्यार्थ्यांनी प्रकाशयुक्त दिवाळी, फटाकेमुक्त दिवाळी अशा घोषणा दिल्या. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी पर्यावरण पूरक दिवाळी कशी साजरी करावी, या विषयी माहिती देऊन विद्यार्थी व सर्व शिक्षकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. ***

शिशुनिकेतन मराठी माध्यम पुणे

कार्यवाह : प्रा. राजेंद्र संपत कांबळे
प्र. मुख्याध्यापिका : सौ. अरुणा कांबळे

संविधानदिन

दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोजी संविधान दिनानिमित्त प्रभात फेरीचे आयोजन केले होते. मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन पाठ्यपुस्तकात नमुद केलेल्या संविधानाचे वाचन केले. सौ. ताम्हनकर यांनी संविधानात नमुद केलेल्या कायदेप्रणालीची विद्यार्थ्यांना थोडक्यात माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी संविधानाची शपथ तसेच प्रतिज्ञा घेतली.

मराठी शुध्द लेखन स्पर्धा

